शिवराजेश्वर मंदिर, किल्ले सिंधुदूर्ग ता. मालवण, जि. सिंधुदूर्ग येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिवराजेश्वर मंदिराच्या दिवाबत्ती, पुजारी तसेच सेवेकऱ्यांच्या मानधनावरील खर्च अनुदानात वाढ करणेबाबत...

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्र.जमीन २९ अ २५/प्र.क्र.३१४/जमीन-०४अ
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक: २० मे, २०२६

<u>संदर्भ</u> :- १. जिल्हाधिकारी, सिंधुदूर्ग यांचे क्र. डेस्क-८/मशा-५/अनुदान वाढविणेबाबत/२०२५, दि.०१ सप्टेंबर, २०२५ व दि.१७ नोव्हेंबर, २०२५ रोजीचे पत्र.

<u>वाचा</u> :- शासन ठराव, महसूल व वन विभाग क्र. डीईव्ही-२९६६/१५१४२२-एल आय, सचिवालय, मुंबई दि.०१ एप्रिल, १९७०.

<u>प्रस्तावना :-</u>

श्री. शिवराजेश्वर मंदिर, किल्ले सिंधुदूर्ग ता. मालवण जि. सिंधुदूर्ग येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या मंदिराचे व्यवस्थापन पाहणाऱ्या देवस्थान न्यासाला देखभाल व दिवाबत्तीकरीता महसूल विभागाकडून संदर्भाधीन दि. ०१ एप्रिल, १९७० अन्वये श्री. शिवराजेश्वर देवस्थान न्यास, सिंधुदूर्ग किल्ला विश्वस्त मंडळास प्रतिमाह रू.२५०/- प्रमाणे वर्षासन रक्कम रू. ३०००/- इतके अनुदान मंजूर करण्यात आलेले आहे. तथापि, सदरहू अनुदान सन-१९७० पासून वाढ करण्यात आलेले नाही. यास्तव, विश्वस्त, श्री. शिवराजेश्वर देवस्थान न्यास, सिंधुदूर्ग किल्ला यांनी दि. १४.०२.२०२० रोजीच्या निवेदनाव्दारे श्री. शिवराजेश्वर देवालयातील पुजारी व इतर सेवेकरी यांचे पगार, मंदिराच्या दिवाबत्तीचा खर्च तसेच, मंदिराकडून आयोजित करण्यात येत असलेले उत्सव याकरीता सदरहू अनुदानाची रक्कम अत्यंत कमी पडत असल्याने अनुदानात वाढ करण्याबाबत विनंती करण्यात आलेली आहे.

श्री. छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिवराजेश्वर मंदिराच्या दिवाबत्ती व इतर साठी देण्यात येणाऱ्या अनुदानात मागील ५५ वर्षात वाढ झालेली नसल्याने, तसेच विश्वस्त, श्री. शिवराजेश्वर देवस्थान न्यास, सिंधुदूर्ग किल्ला यांनी सदर अनुदान वाढ करण्याबाबत केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने, शिवराजेश्वर मंदिर, किल्ले सिंधुदूर्ग ता. मालवण, जि. सिंधुदूर्ग येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिवराजेश्वर मंदिराच्या दिवाबत्ती, पुजारी तसेच सेवेकऱ्यांच्या मानधनावरील खर्च अनुदानात वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

**शासन निर्णय :-**

शिवराजेश्वर मंदिर, किल्ले सिंधुदूर्ग ता. मालवण, जि. सिंधुदूर्ग येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिवराजेश्वर मंदिराच्या दिवाबत्ती, पुजारी तसेच सेवेकऱ्यांच्या मानधनावरील खर्च अनुदानात प्रतिमाह रू.८३३३/- प्रमाणे वर्षासन रू. १ लाख इतके अनुदान मंजूर करण्यात येत आहे.

०२. या बाबीवर होणारा खर्च Demand No. C ४, Sector - A Gerenral Services, Sub Sector-२०७५, Mejor Head-२०७५ Misc. General Services, Minor Head (१०१) Pension in list of resumed jagards. lands territories (१०१) (ii) Pension of resumed lands territories Pension Detailed Head Commissioner Konkon Pension, Pensionary Charges (२०७५०२९४) या लेखाशिर्षातून भागविण्यात यावा. सदर सुधारित अनुदानाचे दर या शासन निर्णयाच्या दिनांकापासून लागू होतील.

सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.२१३/२०२६/व्यय-९ दि.२५.०३.२०२६ अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीस अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०२६०५२०१२३७३८६११९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

MANISHA K JAYBHAYE

Digitally signed by MANISHA K JAYBHAYE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, 2.5.4.20=01343097b2445ecf81676f921be86528e4e82e29792fd17cca89302f5fd01ef6, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=3B4284299520D55C5401385D853BB77E465E2E417BCFDDF3EBB6235BB48DEEFA, cn=MANISHA K JAYBHAYE
Date: 2026.05.20 12:38:55 +05'30'

**( मनिषा जायभाये )**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
३. मा. उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
४. मा. उप मुख्यमंत्री (रा.ऊ.शु.) यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
५. मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
६. मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
७. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय,मुंबई -३२.
८. अप्पर मुख्य सचिव (वित्त विभाग), मंत्रालय, मुंबई -३२.
९. प्रधान सचिव (विधी व परामर्शी), मंत्रालय, मुंबई-३२.
१०. अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे विकाअ/ स्वीय सहायक, मंत्रालय,मुंबई -३२.
११. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखा परिक्षा) महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.

१२. विभागीय आयुक्त, कोंकण, नवी मुंबई.

१३. जिल्हाधिकारी, सिंधुदूर्ग.

१४. जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे.

१५. कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

१६. निवडनस्ती, कार्यासन जमीन-४अ, महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई -३२.